महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in

क्रमांक कशिमं/२०२५/पाच/७९५ दिनांक :- १२.०८.२०२५

वाचावे : १) पत्र क्रमांक कशिमं/२०२५-२६/पाच/५८१, दिनांक २५ जून, २०२५.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एडीआर-२०२५/CN-११८२७३२/प्र.क्र.७४/तांशि६, दिनांक १४ जुलै, २०२५.
३) परिपत्रक क्रमांक कशिमं/२०२५/पाच/२५०, दिनांक :- १५.०७.२०२५.
४) परिपत्रक क्रमांक कशिमं/२०२५/पाच/७७१, दिनांक :- ०७.०८.२०२५.
५) परिपत्रक क्रमांक कशिमं/२०२५/पाच/७८२, दिनांक :- ११.०८.२०२५.

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत बालचित्रकला स्पर्धा २०२५ मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्हा परिषद/नगरपालिका/ महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळामध्ये इयत्तानिहाय ४ गटामध्ये एकाच दिवशी शाळेच्या नियमित वेळेनुसार आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

बालचित्रकला स्पर्धा २०२५ मध्ये विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढावा याकरिता केंद्र शाळेची व विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच शुल्क भरण्याकरिता दिनांक १५ जुलै, २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार दिनांक ०२ ऑगस्ट, २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तसेच दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार दिनांक १० ऑगस्ट, २०२५ पर्यंत मुदत वाढविण्यात आली होती.

**बालचित्रकला स्पर्धेच्या नोंदणीकरिता विहीत मुदतीत ज्या केंद्र शाळेनी नोंदणी केलेली नाही, तसेच दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ज्या केंद्र शाळेनी विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करुन देखील स्पर्धा शुल्क ऑनलाईन पध्दतीने जमा केलेले नाही अशा विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांची चित्रे पुढील प्रक्रियेसाठी विचारात घेतली जाणार नाहीत.**

स्पर्धेमध्ये नोंदणी/ स्पर्धा शुल्क विहीत मुदतीत न भरल्यामुळे विद्यार्थी स्पर्धेपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी केंद्र प्रमुख तथा मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील. याबबत कोणतेही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

प्रति,

१) केंद्र प्रमुख (सर्व), बालचित्रकला स्पर्धा २०२५.
२) केंद्र प्रमुख (सर्व), शासकीय रेखाकला परीक्षा २०२५.
३) मुख्याध्यापक/ प्राचार्य (सर्व) ,जिल्हा परिषद/नगरपालिका/महानगरपालिका/अनुदानित/ विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळा.

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
४) आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे.
५) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
७) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
८) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/(प्राथमिक), जिल्हापरिषद (सर्व)
९) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)
१०) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
११) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग, मुंबई.
१२) निवड नस्ती.

Scanned with OKEN Scanner